जा.क्र.सानप/आरोग्य/ 693
सातारा नगरपरिषद, सातारा
दिनांक - 19-01-2024

# सातारा नगरपरिषद, सातारा

**आरोग्य विभाग, सातारा ४१५००१**

**दुरध्वनी क्रमांक - ०२१६२/२३४०७६/७७, Web-www.sataranp.co.in**

**Email - sataramunicipalhealth@gmail.com**

## ई-निविदा सुचना क्रमांक १ सन २०२४-२०२५ (ऑनलाईन)

मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा ४१५००१ (दुरध्वनी क्रमांक २३४०७६) सातारा नगरपरिषदेच्या प्रभाग क्र. १ ते २५ मधील प्रभाग मधील नगरपरिषद मालकिच्या घंटागाडी मार्फत प्रत्येक प्रभागातील सर्व मिळकती मधील घनकचरा घरोघरी जाऊन संकलन, विलगीकरण करुन सोनगाव येथील कचरा डेपो पर्यंत पोहोच करणे तसेच सातारा नगरपरिषद हद्दीतील सर्व सार्वजनिक शौचालय व मुताऱ्यांची साफसफाई व स्वच्छता करणे तसेच सातारा शहरातील मुख्य रस्ते साफसफाई करणेकामी या कामांकरीता अनुभव असलेल्या संस्था/फर्म/ठेकेदार व्यक्ती यांच्याकडुन विहित नमुन्यातील बी-१ निविदा, ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) २ लिफाफे (two bid system) पध्दतीने वार्षिक दराच्या बी-१ (Percentage Rate) ई-निविदा मागविणेत येत आहेत.

<table>
<tr><th rowspan="2">ई. निविदा क्र</th><th rowspan="2">कामाचे नाव</th><th rowspan="2">अंदाजपत्रकिय रक्कम</th><th rowspan="2">काम पुर्ण करण्याचा कालावधी</th><th colspan="2">बयाणा रक्कम</th><th rowspan="2">ई-निविदा संचाची किंमत</th></tr>
<tr><th>निविदे सोबत</th><th>करारनामा करतेवेळी</th></tr>
<tr><td>१</td><td>प्रभाग क्र. १ ते २५ मधील प्रभाग क्र. १ ते १० मधील नगरपरिषद मालकिच्या घंटागाडी मार्फत प्रत्येक प्रभागातील सर्व मिळकती मधील घनकचरा घरोघरी जाऊन संकलन, विलगीकरण करुन सोनगाव येथील कचरा डेपो पर्यंत पोहोच करणे</td><td rowspan="4">६,३५,३९,५३५/-</td><td rowspan="4">१ वर्ष</td><td rowspan="4">६,३५,३९६/-</td><td rowspan="4">६,३५,३९६/-</td><td rowspan="4">७०८० + १८% जीएसटी १२७४<br>८३५४/-</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रभाग क्र. ११ ते २० मधील नगरपरिषद मालकिच्या घंटागाडी मार्फत प्रत्येक प्रभागातील सर्व मिळकती मधील घनकचरा घरोघरी जाऊन संकलन, विलगीकरण करुन सोनगाव येथील कचरा डेपो पर्यंत पोहोच करणे.</td></tr>
<tr><td>३</td><td>प्रभाग क्र. २१ ते २५ साठी प्रत्येक प्रभागातील सर्व मिळकती मधील घनकचरा घरोघरी जाऊन संकलन, विलगीकरण करुन सोनगाव येथील कचरा डेपो पर्यंत पोहोच करणे यासाठी ठेका पध्दतीने घंटागाडीसाठी वाहन (Tata ACE), घंटागाडी वाहनासाठी चालक, कामगार इत्यादी व मख्य रस्ते, भाजी मंडई व सर्व सार्वजनिक ठिकाणचा कचरा संकलन करुन सोनगाव कचरा डेपो येथे पोहोच करणे</td></tr>
<tr><td>४</td><td>सातारा नगरपरिषद हद्दीतील सर्व सार्वजनिक शौचालय व मुताऱ्यांची साफसफाई व स्वच्छता करणे तसेच सातारा शहरातील मुख्य रस्ते साफसफाई करणे.</td></tr>
</table>

## ई-निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी (निविदा विक्री) | दिनांक :- २०/०१ /२०२४ ते दिनांक :- ०८/०२/२०२४ |
| २ | निविदाकारांनी ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक (तांत्रिक व आर्थिक निविदा दिनांक व वेळ) | दिनांक - ०८/०२/२०२४<br>वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३ | निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक :- १२/०२/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत ऑनलाईन उघडणेत येतील. (शक्य झाल्यास) |
| ४ | निविदा पुर्व बैठक | दिनांक :- ०१/०२/२०२४ रोजी वेळ सकाळी ११.०० वाजता |

**अटी व शर्ती**

१) सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या Main Portal- http://mahatenders.gov.in व याच http://mahatenders.gov.in साईटवर enrolled करणे आवश्यक आहे.

२) निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा टोल फ्री नंबर-(२४x७) १८००३०७०२२३२ / ९१५८२९४३५०

३) सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार मा.मुख्याधिकारी सातारा यांना राखुन ठेवलेले आहेत.

४) कामाचा कालावधी कार्यादेश दिल्यापासून १ वर्षे राहिल.

५) बयाणा रक्कम भरलेली पावती सोबत जोडणे.

६) निविदाधारकाने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ अंतर्गत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी नोंदणी रजिस्ट्रेशन आवश्यक असलेने नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहिल.

७) निविदाधारकाने निविदेसोबत समान काम शासकीय, निमशासकीय यंत्रणे सोबत काम केलेचे किमान ३ वर्ष अनुभव दाखला, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, Income Tax Registration, Pan Card, GST Registration तसेच सन २०२३ अखेर मागील ३ वर्षाचे आय.टी.आर भरणा केले बाबतचे प्रमाणपत्र तसेच मागील ३ वर्षाचे Balance Sheet प्रमाणपत्र सह सादर करणे आवश्यक आहे.

८) सदर कामाबाबत संबंधित नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा भागीदारी नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहिल.

९) निविदाधारकांने निविदेसोबत सादर केलेल्या संस्थे कडून इकडील नगरपरिषदेस कोणत्याही प्रकारचे देय रक्कम अथवा वसुली असू नये याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०) निविदाधारकांने निविदेसोबत सादर केलेल्या संस्थे संदर्भात यापुर्वी कामाच्या ठिकाणी सदर कामा संदर्भात कोणत्याही प्रकारचा न्यायालयीन खटला व काळ्या यादी मध्ये नाव समाविष्ठ नसले बाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

११) निविदाधारकांनी निविदेतील सर्व दस्तऐवज scan करून online ई- निविदा प्रणालीच्या http:// mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार upload करणे अनिवार्य आहे.

**१२) लिफाफा क्र.१ मधिल आवश्यक कागदपत्रांची पुर्तता होत नसल्यास लिफाफा क्र.२ उघडण्यात येणार नाही.**

**मुख्याधिकारी**
**सातारा नगरपरिषद, सातारा**

**निविदा क्रमांक १ मधील अटी व शर्ती -**

१) वाहन चालकाकडे वाहन चालवणेचा वैध परवाना असणे आवश्यक आहे.

२) प्रत्येक वाहनांवर घंटा किंवा स्पीकर लावणे बंधनकारक राहिल व त्यावर नगरपरिषदेने दिलेली लोक प्रबोधन ध्वनीफित वाजविणे बंधनकारक राहिल. इतर कोणत्याही प्रकारची ध्वनीफित लावु नये.

३) प्रभागातील भाजी मंडई, व्यवसायीक ठिकाणे, सार्वजनिक ठिकाणे येथे पडणारा कचरा त्याच दिवशी ट्रॅक्टर ट्रॉली मार्फत उचलुन विलगीकरण करुन सोनगाव घनकचरा डेपोवर त्याच दिवशी पोहोच करणे बंधनकारक राहील.

४) निविदाधारक यांनी प्रत्येक प्रभागातील घनकचरा ठरवून दिलेल्या वेळेतच घरोघरी जाऊन विलगीकृत घनकचरा कचरा गोळा करणेचा आहे. यावर त्या भागातील संबंधित मुकादम व आरोग्य निरिक्षक यांचे नियंत्रण राहील.

५) निविदाधारकाकडील नगरपरिषदेच्या मालकिच्या घंटागाडयांची नियमित देखभाल दुरुस्ती मक्तेदाराने स्वखर्चाने केली पाहीजे. एखादे वाहन बंद पडल्यास तात्काळ पर्यायी वाहनाची व्यवस्था करून काम सुरू ठेवणे मक्तेदारावर बंधनकारक राहील.

६) कचरा वाहतुकीच्या प्रत्येक फेरीची नोंद करतेवेळी नोंद वही ठेवणे बंधनकारक राहील. तसेच प्रति दिन किमान ३ फेऱ्या करणे आवश्यक असुन आवश्यकतेनुसार नगरपरिषद सांगेल त्यावेळी ज्यादा फेऱ्या करणे बंधनकारक राहिल.

७) दैनंदिन घरोघरी जाऊन घंटागाडीव्दारे कचरा संकलन करणे कामाची वेळ सकाळी ७ ते १ व दुपारी २ ते ६ अशी राहील. या व्यतिरिक्त आवश्यक त्या प्रमाणे वाहन बोलाविले जाईल. तसेच शहरातील मुख्य रस्त्यांची रात्री साफ सफाई (Night Sweeping) केलेनंतर निर्माण होणारा कचरा/गाळ संकलित करुन सोनगाव कचरा डेपो येथे पोहोच करणेकामी आवश्यक्तेप्रमाणे वाहन उपलब्ध करुन देणे मक्तेदार यांचेवर बंधनकारक राहील.

८) सदर कामाबाबत काम समाधानकारक पूर्ण झालेबाबतचा आरोग्य निरिक्षक यांचे पूर्तता अहवालानंतर बील अदा केले जाईल.

९) कर्मचाऱ्यांची यादी त्यांचे आर.टी.ओ. कडील योग्य त्या व्यवसायिक वर्गातील चालक परवान्यासह व बदली कामगारासह वर्क ऑर्डरपुर्वी नगरपरिषदेस सादर करणे बंधनकारक राहील त्या शिवाय वर्क ऑर्डर दिली जाणार नाही.

१०) नगरपरिषदेस यंत्रणा सुरळीत व सक्षमतेने चालविणेच्या दृष्टीने आणि घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०१६ व प्लास्टिक बंदी अधिनियम २०१६ ची अंमलबजावणी करणेच्या दृष्टीने त्यामधील तरतुदी अटी, शर्ती लागु राहतील.

११) कचरा वाहतुकी बाबत नागरीकांच्या, व्यवसायिकांच्या तक्रारी येणार नाहीत अशा प्रकारे बंदिस्त वाहनातुन कचरा वाहतुक करावयाची आहे. वाहतुकीच्या वेळी कचरा/घाण रस्त्यावर सांडणार नाही याची खबरदारी मक्तेदार यांनी घ्यावयाची आहे.

१२) कामाचे ठिकाणी मक्तेदार किंवा मक्तेदार यांनी नमुद केलेल्या व्यक्ती व्यतिरिक्त अन्य कोणी काम करुन घेत असल्याचे आढळुन आल्यास संबंधित मक्तेदार यांचेवर कारवाई करणेचे अधिकार मुख्याधिकारी यांना राहतील.

१३) निविदाधारकाकडील कामगार व पर्यवेक्षक कर्मचारी यांची नावासह यादी, तसेच कामगार कायदयानुसार आवश्यक परवाने निविदा मंजुर झाल्यावर सादर करणे आवश्यक राहील.

१४) निविदाधारक यांनी तीन महिन्यातून एकदा कर्मचारी यांची वैद्यकीय तपासणी करणे व कर्मचा-यांचा विमा उतरविणे आवश्यक आहे व त्याची एक प्रत ३० दिवसाच्या आत नगरपरिषदेस देणे बंधनकारक राहिल.

१५) कामगारांचेकडुन काम करुन घेताना मक्तेदार यांनी सर्व प्रकारची सुरक्षा घेण्याची आहे. काम करताना कोणत्याही प्रकारची दुखापत, दुर्घटना, अपघात झाल्यास किंवा यामध्ये कामगाराचा मृत्यु झाल्यास

त्याबाबतची वित्तीय किंवा इतर प्रकारची भरपाई यास मक्तेदार जबाबदार राहतील. याची जबाबदारी नगरपरिषदेवर राहणार नाही.

१६) प्रत्येक कर्मचाऱ्यास ओळखपत्र देणेची जबाबदारी निविदाधारक यांचेवर राहिल.

१७) किमान वेतन कायदा १९४८, वेतन प्रदान १९३६, बालकामगार ( प्रतिबंध व निर्मुलन ) अधिनियम १९८६ व अन्य कामगार कायदयाचे तसेच सक्षम प्राधिकारी यांच्या आदेशाचे पालन करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

१८) निविदेच्या अंजदाजपत्रकिय रक्कमेच्या किमान ५,००,००,०००/- पर्यंत मागील ३ वर्षामध्ये वार्षिक आर्थिक उलाढाल असणे आवश्यक आहे.

१९) हे काम सर्व प्रकारचे सुट्टयांचे दिवस धरुन, सर्व दिवशी चालु ठेवणेचे आहे. त्यामुळे कामागारांना सुट्टया देण्यासाठी मक्तेदार यांचेकडे पर्यायी कर्मचारी उपलब्धता असणे आवश्यक आहे.

२०) निविदाधारकाने कामगाराचे किमान वेतन कामगार कायदयाने पगार देणे बंधनकारक राहील. किमान वेतन कायदयाप्रमाणे होणाऱ्या रक्कमेपेक्षा कमी रक्कमेची निविदा स्विकारली जाणार नाही.

२१) कामगारा संबंधीचे ईपीएफ नियमातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे निविदाधारक यांचेवर बंधनकारक राहील. तसेच प्रत्येक कामागाराचे ईपीएफ चे खाते काढुन ईपीएफ भरले याबाबतचे चलन सादर केलेनंतर बिल अदा करणेत येईल.

२२) निविदाधारकाने कामाचा महिना पुर्ण झालेनंतर कामगारांचे वेतन करुन वेतन अदा केलेला तपशिल व ई.पी.एफ चलन बिलासोबत सादर करुन प्रत्येक मासिक बिल ५ दिवसांचे आत सादर करणे बंधनकारक आहे.

२३) देयकाची अदायगी नगरपरिषदेकडील उपलब्ध निधीनुसार केली जाईल. देयके अदा करणेस विलंब झाल्यास संबधीत ठेकेदार/निविदाधारकाने कामगाराचे पगार थकित ठेवू नयेत. तसेच मक्तेदार यांनी बिल मागणी अर्ज सादर करतेवेळी बिल हे टॅक्स इनव्हाईस असणे आवश्यक आहे.

२४) कामाचा कार्यादेश दिलेनंतर ठेकेदारामार्फत मुदतीपुर्वी काम बंद केलेस अथवा सोडुन दिलेस सदर संस्थेचा ठेका रद्द करणेत येईल व त्याची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

२५) केंद्र व राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे योग्य ते कर प्रचलित दरानुसार होणाऱ्या बिलातून कपात करणेत येतील.

२६) निविदा धारकाकडे पाच स्थानिक स्वराज्य संस्था, शासकिय व निमशासकिय कार्यालये येथे निविदेत नमुद केलेले कामे केले असले बाबतची कागद पत्रे सादर करणेत यावीत.

२७) कोणत्याही परिस्थितीत निविदाधारकाला या निविदेतील कोणत्याही बाबीसाठी वाढीव दर मागण्याचा हक्क असणार नाही.

२८) वरील कामाबाबत कोणाताही वाद निर्माण झालेस तो सातारा नगरपरिषदेस ज्या न्यायालयाच्या कक्षेत येते, त्या कक्षेत चालेल.

२९) निविदा दर भरणेपुर्वी कामाची व्याप्ती, क्षेत्र, पध्दत आणि घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०१६ यांची माहिती निविदाधारकाने घेणेची आहे. तसेच या नियमांच्या तरतुदीप्रमाणे आणि शासनाकडील वेळोवेळीच्या शासन निर्णय, परिपत्रकाप्रमाणे नगरपरिषदेकडील उपविधीप्रमाणे काम करणेची जबाबदारी निविदाधारकावर राहील.

३०) कार्यादेशाचा कार्यकाळ संपलेनंतर नगरपरिषद मालकिच्या घंटागाडया सुस्थीतीत नगरपरिषदेकडे वर्ग करणेच्या आहेत. वाहन परत ताब्यात घेताना त्यांचा रंग, हाड्रोलिक यंत्रना अदयावत असणे, इंजीन योग्य प्रकारे कार्यरत असणे, ब्रेक, इलेक्ट्रीक सिस्टीम/वाहनांची बॅटरी, टायर सुस्थितीत असणे आवश्यक आहे. याबाबतचे सर्टिफिकेट अधिकृत कंपनी सर्व्हिस डिलर कडुन घेऊन नगरपरिषदेस सादर करणे निविदाधारकावर बंधनकारक आहे.

३१)स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत मिळकतीचे **ICT Based प्रणालीद्वारे क्युआर कोड स्कॅन करणे बंधनकारक** राहील.

३२)निविदाधारक यांनी नगरपरिषदेची वाहने ताब्यात दिलेनंतर त्याची तपासणी करुन त्यानंतर डिपॉझिट रक्कम परत केली जाईल.

३३)प्रभाग क्र. २१ ते २५ मध्ये कचरा संकलन करणेसाठी टाटा एसीइ (घंटागाडी) वाहन ओला व सुका कंर्पाटमेंट केलेले असणे आवश्यक आहे.

३४)निविदाधारकामार्फत पुरविणेत येणाऱ्या घंटागाडी व ट्रॅक्टर ट्रॉलीसाठी इंधन पुरविणे व देखभाल दुरुस्ती करणेची जबाबदारी मक्तेदार यांचेवर राहिल.

३५)निविदाधारक यांनी पाण्यासाठी किमान ५,००० लीटर क्षमतेची टाकी तयार करुन पंपींग मशीन, पाईप सेट व इतर साधनसामग्री व त्यासोबत आवश्यक बादल्या व खराटे, पाण्याची पाईप, इत्यादी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

३६)नगरपरिषदेकडे प्राप्त होणा-या तक्रारी संबंधी दखल घेणे व तक्रारींची पुर्तता करणे मक्तेदार यांचेवर राहील.

३७)नगरपरिषदेस यंत्रणा सुरळीत व सक्षमतेने चालवणेच्या दृष्टीने इतर अटी, शर्ती आवश्यकतेप्रमाणे अंतर्भूत करणेत येतील.

३८)सदरचे काम सर्व प्रकारचे सुट्टयांचे दिवस धरुन, सर्व दिवशी चालु ठेवणेचे आहे. त्यामुळे कामागारांना सुट्टया देण्यासाठी मक्तेदार यांचेकडे पर्यायी कर्मचारी उपलब्धता असणे आवश्यक आहे.

३९)रस्ते सफाईसाठी प्रतिदिन प्रती १००० मीटर साठी किमान १ सफाई कर्मचारी असणे अत्यावशक आहे. प्रत्येक कर्मचाऱ्यास ओळखपत्र देणेची जबाबदारी निविदाधारक यांचेवर राहिल.

४०)दैनंदिन रस्ते सफाई या कामाची वेळ सकाळी ७ ते ११ व दुपारी २ ते ५ अशी राहील. तसेच कामाच्या आवश्यकते प्रमाणे कर्मचारी उपलब्ध करुन देणे मक्तेदार यांचेवर बंधनकारक राहील.

४१)दैनंदिन रात्री ९.०० ते १.०० या कालावधीमध्ये रात्रीचे मुख्य रस्ते सफाई (Night Sweeping) करुन निर्माण होणारा कचरा/गाळ घंटागाडी/ट्रॅक्टर ट्रॉली मार्फत संकलित करुन सोनगाव कचरा डेपो येथे पोहोच करणे मक्तेदार यांचेवर बंधनकारक राहील.

४२)अपवादात्मक परिस्थिती व तातडीच्या कामासाठी कोणत्याही वेळी नगरपरिषद आदेशानुसार सफाई कामगार उपलब्ध करुन देणेची जबाबदारी निविदाधारक यांचेवर राहिल. तसेच याकामासाठी अतिरिक्त मानधनाची मागणी करता येणार नाही.

४३)भागातील दैनंदिन स्वच्छता करणेकामी पुरविणेत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना आवश्यक असणारी हत्यारे उदा. खराटे, घमेली व तत्सम साहित्य निविदाधारक यांनी पुरविणेचे आहे. तसेच सुरक्षासाधने पुरविणेची जबाबदारी निविदाधारक यांची राहिल.

४४) दंडाची तरतुद :-

A. घंटागाडी/ट्रॅक्टर ट्रॉलीवर कामगार नसणे प्रतिदिन रुपये ५००/-
B. घंटागाडीला/ट्रॅक्टर ट्रॉलीला घंटा किंवा स्पीकर न वापरणे प्रतिदिन रुपये ५००/-
C. घंटगाडीला/ट्रॅक्टर ट्रॉलीला बोर्ड नसणे प्रतिदिन रुपये ५००/-
D. घंटगाडीतील/ट्रॅक्टर ट्रॉलीमधील कचरा झाकुन न नेणे प्रतिदिन रुपये ५००/-
E. संपात सहभागी झालेस किंवा कोणत्याही कारणाने वाहन बंद ठेवल्यास प्रति वाहन प्रतिदिन रुपये ५०००/-
F. वाहनातील जी.पी.एस यंत्रणा बंद झालेस प्रति दिन प्रति वाहन रुपये ५००/-
G. कर्मचारी यांना सुरक्षा साधने न दिलेस प्रति दिन प्रति कर्मचारी रुपये २००/-
H. दैनंदिन शौचालय व मुताऱ्या सफाई व स्वच्छता न केलेस प्रति इमारत प्रति दिन रुपये ५००/-
I. कामगारांना ओळखपत्र न दिल्यास प्रति दिन रु. २००/-

मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद, सातारा